प्रकरण: ५

पंकज मलिक आणि के. सी. डे
सायगलांचे समकालीन सहकारी

पंकज मलिक आणि के. सी. डे हे दोघं इंडस्ट्रीतले श्रेष्ठ गायक-संगीतकार होते. तरीही त्यांच्या नशिबी सायगलांपेक्षा अधिक संघर्ष वाट्याला आला. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची कल्पना येऊन पंकजदा मनातल्या मनात धुमसत. पण स्वत:च्या कामावर त्यांनी त्याचा कधीच परिणाम होऊ दिला नाही. काही कारणास्तव के. सी. डेंची नजर जन्मभरासाठी हरवली. पण त्यामुळे त्यांची संगीत साधना थांबली नाही. उलट त्यांचं संगीत अधिक निखरत गेलं.

□ रजनीकुमार पंड्या

प्रत्येक कलाकाराला थोड्याफार फरकाने असा अनुभव येत असावा किंवा जाणीव होत असावी की, त्यांना त्यांच्या योग्यतेनुसार सन्मान मिळत नाही. त्यांची कदर होत नाही. कुंदनलाल सायगलांच्या बाबतीत मात्र हा अनुभव अगदीच कमी कालावधीसाठी आला. पंकज मलिकांवर हा अन्याय जास्त झाला. त्यांचे एक निकटवर्ती संगीतकार अजित शेठ यांनी संपादित केलेल्या 'गुजर गया वह जमाना' नावाच्या आत्मचरित्रपर पुस्तकात या आठवणी सापडतात. द न्यू थिएटर्सच्या निर्मितीच्याही आधीपासून पंकज मलिक रायचंद बोराल यांच्या संपर्कात होते. पण तरीही संस्थेचे मुख्य संगीतकार म्हणून बोराल यांचंच नाव पुढे यायचं. अनेक सिनेमांच्या क्रेडिट टायटल्समध्ये संगीतकार म्हणून बोराल यांचं एकट्याचंच नाव ठळक अक्षरांत दिसायचं. १९३५च्या *करोडपती*पासून पंकजदा यांचं नाव पडद्यावर दिसू लागलं, पण अगदी छोट्या टाईपमध्ये. १९३७च्या *मुक्ती*पासून हा सिलसिलाही बदलला आणि त्या सिनेमात संगीत-दिग्दर्शक म्हणून त्यांचं नाव स्वतंत्रपणे पडद्यावर आलं. दरम्यानच्या काळात अनेक चित्रपटांत ते फक्त सहाय्यक संगीतकारच राहिले. १९३३मध्ये प्रदर्शित झालेल्या *राजराणी मीरा* सिनेमात फक्त पंकजदांचंच संगीत असूनही द न्यू थिएटरचे संस्थापक बी. एन. सरकार यांनी पंकजदांकडून आर. सी. बोराल यांच्या बाजूने लिखित कबुली जबाब घेतला होता. पंकजदा या अन्यायाविरुद्ध आवाज उठवू शकले असते. पण त्यामुळे नोकरीवरून कमी केलं जाण्याची भीती होती. इतकंच नाही तर, *पुरणभक्त* या चित्रपटाच्या रिळांचे डब्बे उचलून ते लाहोरला पाठवण्यासारखं एखादं हलकं कामही त्यांना सांगण्यात येत असे, तेव्हा ते फार कष्टी होत. बी. एन. सरकारांच्या देखरेखीखाली द न्यू थिएटर्सची वाटचाल सुरू होती. गमतीची गोष्ट अशी की, सुरुवातीला बोराल आणि नंतर देवकी बोस, नीतिन बोस यांच्यासारख्या धुरिणांची नाराजी असूनही कुंदनलाल सायगल आपल्या मार्गाने पुढे जातच राहिले. १९३२मध्ये त्यांची 'झुलना झुलाओ...' आणि 'होरी हो ब्रजराज दुल्हारे...'सारखी नॉनफिल्मी गाणी सुपर डुपर हिट झाली. पण चित्रपट क्षेत्रात ते खऱ्या अर्थाने नावारुपाला आले ते १९३४मध्ये प्रदर्शित झालेल्या *चंडीदास* या सिनेमामुळेच. *पूरणभक्त* सिनेमातली त्यांच्या आवाजातली 'भजू मैं तो भाव से गिरधारी...' आणि 'अवसर बीतो जाय...' ही गाणीही लोकप्रिय ठरली. पण त्याच सिनेमातली के. सी. डेंची 'जाओ जाओ ऐ मेरे साधो रहो गुरू के संग...' आणि 'क्या कारण है अब रोने को...'सारखी भक्तीगीतं अधिक गाजल्यामुळे सायगलांची गाणी थोडी मागे पडली. त्या सिनेमात एकूण वीस गाणी होती. पण सायगलांच्या वाट्याला फक्त चारच गाणी आली. ती त्यांच्यावरच चित्रीत करण्यात आली होती. महत्त्वाचं म्हणजे त्या चार गाण्यांपुरतीच त्यांची भूमिका होती. त्यामुळे नायक-नायिका कुमार आणि अन्वरी यांच्यानंतर त्यांचं नाव खूप मागे होतं. हे कुमार म्हणजे १९६०च्या *मुगल-ए-आझम*मधले शिल्पकार भूमिका करणारे कलाकार.

के. सी. डेंविषयी बोलताना त्यांच्या आयुष्यातल्या अनेक अनोख्या गोष्टींची आठवण निघते. त्यांच्याविषयी एक स्वतंत्र लेख लिहीता



के. सी. डे: फिल्मीपेक्षा नॉनफिल्मी गीतांनी अधिक लोकप्रियता मिळवून दिली.

येईल. वयाने ते बी. एन. सरकारांपेक्षा एक वर्षाने मोठे होते. त्यामुळे सरकार नेहमीच त्यांना वडीलभावाप्रमाणे मानत. त्यांच्यात कधी मतभेदाचे प्रसंग निर्माण झालेच नाहीत. त्यांचे वडील शिवचरण डे आणि रत्नमालादेवी. १८९३ साली जन्माष्टमीच्या दिवशी के. सीं.चा जन्म झाला म्हणून त्यांचं नाव कृष्णचंद्र असं ठेवण्यात आलं. लहानपणापासूनच के.सीं.ना संगीताचं वेड होतं.

त्यांचे पुतणे आणि प्रसिद्ध पार्श्वगायक मन्ना डे यांनीही के. सी. डेंच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. तेरा वर्षांचे के. सी. मॅट्रीकच्या परिक्षेला बसलेले असताना खूप आजारी पडले. ऐन परिक्षेच्या दिवसांत त्यांना प्रचंड डोकेदुखी सुरू झाली. आणि त्या आजारपणातच त्यांची नजर गेली. त्यांना अंधत्व आलं. पण या आघाताने ते खचले नाहीत. उलट त्यांची संगीतसाधना वाढत गेली. शशीभूषण डे यांच्यापासून बादल खान, राधारमण दास यांच्यासारख्या प्रसिद्ध गुरूंकडे त्यांनी संगीताची तालीम घ्यायला सुरुवात केली. खयाल आणि ध्रुपद गायकीवर त्यांनी अधिक भर दिला. १९५७ साली त्यांची पहिली ग्रामोफोन रेकॉर्ड बाजारात आली. त्यातला त्यांचा काळजाला भिडणारा, तरल स्वर आणि किंचित घोघरा आवाज यामुळे ही रेकॉर्ड बंगालमध्ये खूप लोकप्रिय झाली. त्यांच्या गायकीतले भाव काळजाला भिडत.

१९२३मध्ये त्यांनी पहिल्यांदा रंगभूमीवर पदार्पण केलं त्यावेळी बंगाली नाट्यसंगीतही तितकंच लोकप्रिय होत असे. १९२४मध्ये त्यांनी जोगेशचंद्र चौधरींच्या *सीता* या पौराणिक नाटकात गयलेलं 'अंधकारेर अंतरे ते अश्रूबादल झुरे...' हे गाणं गाऊन सबंध बंगालला वेड लावलं होतं. रातोरात ते ग्रामोफोन सेलिब्रिटी म्हणून ओळखले जाऊ लागले. त्या नाटकाने या एका गाण्याच्या जोरावर ५ जुलै १९२५ ला म्हणजे अवघ्या एका वर्षात शंभर प्रयोग पूर्ण केले. त्यांचं अंधत्व कधीच त्यांच्या अभिनयाच्या आड आलं नाही. १९२८ साली बंगाली रंगभूमीवर दाखल झालेल्या शरतचंद्र घोष यांच्या *जातिच्युत* या नाटकाला लाभलेल्या यशाने ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली. त्यात त्यांनी गिरीनाथनची भूमिका रंगवली होती. आणि मग केसीडेंना पुन्हा मागे वळून पाहायची गरजच भासली नाही. एका पाठोपाठ एक त्यांच्या ग्रामोफोन रेकॉर्ड्स बाजारात येऊ लागल्या. 'अंधकारेर अंतरे ते...' मध्ये रवीन्द्र संगीताचं माधुर्य त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवलं. १९३०मध्ये त्यांनी स्टार थिएटरची प्रसिद्ध गायिका मिस तारकबाला ऊर्फ मिस लाईट हिच्याशी गांधर्वविवाह केला होता. संगीत या समान आवडीमुळे या दोघांमध्ये प्रेमसंबंध जुळून आले होते हे वेगळं सांगायला नको. पुढे त्यांच्या मुलाचं चौदाव्या वर्षी अकाली निधन झालं.


अर्थात, नाट्यक्षेत्रात मिळालेल्या या यशानंतर त्यांनी चित्रपटांत पदार्पण केलं. कोलकात्याच्या मादन थिएटर्सच्या १९३१ रोजी रिलीज झालेल्या एका बंगाली सिनेमात त्यांनी दोन गाणी गायली. चित्रपटांत सक्रीय झाले म्हणून त्यांनी रंगभूमीशी नातं तोडलं असंही नाही. शिवाय ते बिनफिल्मी ग्रामोफोनसाठी रेकॉर्डिंगही करत होते. अशारितीने बंगाली संगीतरसिकांच्या मनात त्यांनी आपलं स्थान निर्माण केलं होतं.

द न्यू थिएटर्सच्या बाबतीत बोलायचं झालं तर, त्यांची आणि सायगल यांची द न्यू थिएटर्समध्ये एकाच वेळी एन्ट्री झाली असं म्हणायला हरकत नाही. *पूरणभक्त* या सिनेमातून हे दोन गायक लोकांसमोर आले. *पूरणभक्त*मधल्या सायगलांच्या दोन्ही गाण्यांची रेकॉर्ड बाजारात आली होती. या सिनेमात चौधरी मोहम्मद रफीक, कुमार, अन्वरी, के.सी.डे., उमा शशी, मेलीना, अन्सारी, विक्रम कपूर आणि तारा हे कलाकार होते. सायगल यांच्या वाट्याला दोन गाणी आणि काही संवाद इतकंच आलं होतं. देवकी बोस यांनी याचं दिग्दर्शन केलं होतं तर नीतिन बोस कॅमेरामन होते. या दोघांनी बोराल यांच्या आग्रहाखातर काहीशा नाराजीनेच सायगलांना यात भूमिका देऊ केली होती. शरीर बांधेसूद नाही, चेहरा आकर्षक नाही आणि डोक्यावरचे केस ऐन तारुण्यात विरळ होत चाललेले. अशा या मुलाला बोरालांनी सिनेमात घेण्याचा निर्णय घ्यावा हे या दोघांना पटलेलं नव्हतं. नीतिन बोस तर सगळ्यांना उघडपणे सांगत, मी याचे शॉट घ्यायला लागलो तर माझ्या कॅमेऱ्याची लेन्सही याला शूट करायला नकार देईल. पण याच नीतिन बोसनी पुढे या सिनेमात सायगलांचा आवाज आणि महत्त्वाचं म्हणजे त्यांच्या नायकाच्या नसलेल्या चेहऱ्यालाही दर्शकांचा प्रतिसाद पाहून तोंडात बोटं घालायचंच तेवढं बाकी ठेवलं होतं.

चित्रा सिनेमानंतर कोलकात्याच्या विलिंग्डन थिएटरमध्येही *पूरणभक्त* रिलीज झाला होता. तिथे तो हाऊसफुल्लही होत होता. पण नियमानुसार अमुक एका कालावधीनंतर दुसऱ्या सिनेमासाठी तो खाली उतरवण्याचा निर्णय थिएटर मालकाला घ्यावा लागला, तेव्हा बी.एन. सरकारनी त्यांच्याविरुद्ध न्यायालयाकडून स्टे ऑर्डर आणवला.

*पूरणभक्त*मध्ये आर.सी. बोराल यांनी दिलेलं संगीतही अलौकिक होतं. ते स्वतः संगीतकार म्हणून समर्थ होतेच, पण त्यांच्या बरोबरीने पंकज मलिक यांचाही सिंहाचा वाटा होता. त्यांना टायटल्समध्ये त्याचं पूर्ण श्रेय देण्यात आलं नव्हतं हेही खरं. पण आपली नाराजी त्यांनी कामातून कधीच दिसू दिली नाही. शिवाय त्यांच्यामुळेच प्रसिद्ध बासरीवादक पन्नालाल घोष आणि त्यांच्याइतकेच प्रसिद्ध असलेले हार्मोनियमवादक कोही मोहम्मद आर. सी. बोराल यांच्या वाद्यवृंदात दाखल झाले होते. तिमिर बरन यांच्यासारख्या भावपूर्ण संगीत देणारे स्वरनियोजकही पंकजदांच्या प्रयत्नाने द न्यू थिएटर्सशी जोडले गेले होते. १९३५मध्ये प्रदर्शित झालेल्या *देवदास* या हिंदी चित्रपटाला त्यांनी मागाहून स्वतंत्रपणे संगीत दिलं होतं आणि म्युझिकल हिट म्हणून *देवदास*ची नोंद झाली होती. १९३५च्या *पूजारी*चं मधुर संगीतही त्यांनीच दिलं होतं. त्यात सायगलांचं 'जो बीत चूकी सो बीत चूकी, अब उनकी याद सताये क्यू...' हे हिट गाणंही होतं.


असो, याशिवाय द न्यू थिएटर्सच्या संगीत मंडळीत आर.सी. बोराल यांचे भाऊ जलुदा म्हणजेच




बिशनचंद्र बोरालही होते. त्यांनी द न्यू थिएटर्सच्या *सीता*पासून स्वतंत्र संगीत द्यायला सुरुवात केली. १९३२च्या *नटीर पूजा*चे दिग्दर्शक आणि लेखक रवींद्रनाथ टागोर होते आणि त्यांचेच भाचे म्हणजे द्विजेन्द्रनाथ यांचे सुपूत्र दिनेन्द्रनाथ ठाकूर यांनी त्याला संगीत दिलं होतं. हे अपवाद वगळता द न्यू थिएटर्समध्ये संगीतकार म्हणून फारशी कोणाची वर्णी लागलीच नाही.

आर.सी. बोराल यांचे वडील लालचंद बोराल हे प्रसिद्ध जमीनदार होते. पण त्या काळात कुशल पखवाजवादक म्हणूनही त्यांचा नावलौकीक होता. १९०३च्या ऑक्टोबर १९ रोजी जन्मलेल्या रायचंद यांच्या कानावर अगदी बालपणापासूनच संगीताचे संस्कार होत होते. ते पाच वर्षांचे असतानाच त्यांचे वडील निवर्तले. तरीही ग्वाल्हेर घराण्यातले प्रसिद्ध सरोदवादक हाफीज अलीखा साहेबांच्या सल्ल्याने त्यांचे मोठे बंधू त्यांना मजीदखां यांच्याकडे तबल्याची तालीम घेण्यासाठी घेऊन गेले. काही दिवसांतच लहानगे हात आणि बोटं तबल्यावर अशी काही चालू लागली की त्यांचे उस्तादही ते पाहून खूश झाले. तबला शिकता शिकता त्यांनी दुसऱ्या काही वाद्यांशीही हातमिळवणी केली होतीच. पण तबल्याकडे त्यांचा ओढा जरा जास्त होता.

एकवीस वर्षांचे असताना लखनौच्या एका महत्त्वाच्या संगीतसंमेलनात त्यांचं फार कौतुक झालं होतं. त्या वयात त्यांना सारस्वत महामंडळाने पदवी देऊन सन्मानित केलं होतं. इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्विस म्हणजेच आजचं आकाशवाणी यांच्यावतीनेही संगीत विभागाची जबाबदारी सांभाळण्याचा प्रस्ताव आला. नृपेन्द्र मजूमदारांच्या सल्ल्याने त्यांनी तो स्वीकारलाही. प्राचीन आणि पाश्चात्त्य संगीताचा भारतीय वाद्यांच्या सहाय्याने सुरेख समन्वय साधत त्यांनी स्वदेशी ऑर्केस्ट्राची रचना केली होती. रेडीयोवर काम करत असतानाच त्यांचा पंकजदांशी परिचय झाला. मधुर कंठ आणि अलौकिक प्रतिभा असलेले पंकजदा रेडीयोवरही बोराल यांच्यापेक्षा खालच्या पदावर काम करत होते. त्यामुळे त्यांच्या मनात नेहमीच एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला होता. हीच भावना पुढे द न्यू थिएटर्समध्ये काम करतानाही वाढीस लागली. आर. सी. बोराल आणि पंकजदा यांच्यात गाढ मैत्री होती, एकाच क्षेत्रातले असूनही व्यावसायिक स्पर्धा नव्हती. म्हणूनच अनेक चित्रपटांना उत्कृष्ट संगीत देऊनही पंकजदांनी यशाचं श्रेय एकट्या बोरालांच्या नावे केलं होतं.


द न्यू थिएटरचा स्टुडियो

*पूरणभक्त*मध्ये जी दोन गाणी सायगलांच्या आवाजात होती, त्यांच्या संगीतात पंकजदांचा वाटा अधिक होता, तरीही पडद्यावर नाव दिसलं ते बोरालांचंच. द न्यू थिएटर्सचे कुशल कॅमेरामन आणि बी.एन. सरकारांचे विश्वासू युसूफ मूलजी यांनीही एकदा वेळप्रसंग पाहून पंकजदांवर अन्याय होतोय, ही बाब बोराल यांच्याकडे बोलून दाखवली होती. पण बोरालनी


लॉरेल ॲण्ड हार्डी चित्रपटावरून *दुलारी बीबी*ची निर्मिती करण्यात आली.

त्यांनाही दाद दिली नाही. उलट त्यानंतर बोरालांच्या मनात युसूफ मुलजींविषयीही किंचित कटूता निर्माण झाली.

या अंतर्गत बाबी असूनही १९३३ हे वर्ष द न्यू थिएटर्सच्या वाटचालीत महत्त्वाचं वर्ष ठरलं. *मस्तुतो भाई, कपालकुंडला, सीता, मीराबाई* हे चार बंगाली आणि *पूरणभक्त, राजराणी मीरा, यहूदी की लडकी* आणि *दुलारी बीबी* अशा चार हिंदी चित्रपटांची निर्मिती करून द न्यू थिएटर्सने बाजी मारली होती. याशिवाय चारशे फूटांचं *इदका गाना* आणि चारशे तीस फूट लांबीची *जे.एम.गुप्तांची स्मशानयात्रा* यासारखी वृत्तचित्रंही त्यांनी बनवली. *नंदबार* नावाचा एक तामीम सिनेमाही बनवला. *यहूदी की लडकी*मध्ये संगीतकार म्हणून आर.सी. बोराल यांचंच नाव होतं. तरीही पंकज मलिक यांनी सायगलच्या आवाजात मिर्झा गालिब यांची 'नूकताचीं है गमे दिल...' ही गझल आणि एक 'लग गई चोट करजवामें हाय रामा...' हे पारंपरिक गीत गाऊन घेतलं होतं. हरमंदिर सिंग हमराज यांच्या गीतकोशात या सिनेमाचे संगीतकार म्हणून पंकज मलिक यांचं नाव आहे. पण फिल्मोग्राफीत मात्र आर. सी. बोराल यांचं नाव संगीतकार म्हणून आढळतं. त्या सिनेमात सायगलांनी प्रिन्स मार्कवीसची भूमिका साकारली होती. पण ते रॉमॅण्टिक भूमिकेत फारसे चांगले वाटले नाहीत. *राजराणी मीरा*मध्ये पृथ्वीराज कपूर नायक होते आणि दुर्गा खोटे नायिका होत्या. बोराल यांच्या संगीतातली बरीचशी गाणी स्त्री कंठातली होती. इंदुबालांनी ती गायली होती, पण ती फारशी लोकप्रिय ठरली नाहीत.

सायगल गंभीर स्वभावाचे होते आणि आपल्या गीतांतून ते करूण रसाची गाणी अधिक प्रभावीपणे गाऊ शकत होते. पण स्वतःला कॉमेडीयन म्हणवून घेत त्यांनी अनेकदा लोकांना हसवलंही आहे. १९३३च्या *दुलारी बीबी*मध्ये त्यांना नायकाची भूमिका देऊ करण्यात आली होती. मोलीनादेवी यांनी त्यांच्या भांडखोर पत्नीची भूमिका साकारली होती. तो सिनेमा म्हणजे हॉलीवूडच्या लॉरेल आणि हार्डीच्या *अवर वाईव्ज*ची नक्कल होता. पहिल्याच दृश्यात सायगल जीन्यावरून धापा टाकत उतरतात असा सीन होता. त्यांची पत्नी त्यांच्या अंगावर भांडी फेकत असते. त्या दृश्याला थिएटरमध्ये वन्स मोअर मिळत असे. आता बोला.

पण द न्यू थिएटर्सचा खरा गवगवा झाला तो त्यांच्या १९३४ साली प्रदर्शित झालेल्या *चंडीदास* या सिनेमामुळेच. आणखीही एका कारणामुळे हे वर्ष महत्त्वपूर्ण ठरलं. (क्रमशः)